प्रधानमंत्री युवा योजनेच्या राज्यातील अंमलबजावणीच्या सनियंत्रणासाठी Joint Working Group गठीत करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: कौविउ- २०१८/प्र.क्र.९४/अभियान-१,**
**२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**दिनांक : १९ एप्रिल, २०१८**

वाचावे :- सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक PMYY/OPS/17-18/Policy (PC-I)/122, दिनांक ०७/०३/२०१८

**प्रस्तावना :**

सर्व राज्य/केंद्रशासित प्रदेशातील महाविद्यालये, विद्यापीठे, तंत्र निकेतने, शाळा, औद्योगिक प्रक्षण संस्था आणि उद्योजकता विकास केंद्रांमध्ये उद्योजकता विकास प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने "प्रधानमंत्री युवा योजना" ही फ्लॅगशिप योजना सन २०१७-१८ ते २०२१-२२ या ०५ वर्षाच्या कालावधीत कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचेमार्फत राबविण्यात येणार आहे. सदर योजनेंतर्गत इयत्ता ११ वी व १२ वी/पदविका/पदवी/पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी/ प्रशिक्षणार्थ्यांना उद्योजकता प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर योजनेची अंमलबजावणी National Institute for Entrepreneurship and Small Business Development (NIESBUD), Noida यांचेमार्फत पॅन इंडिया नेटवर्क्स यांच्या Entrepreneurship Resource and Coordination Hubs (E-Hubs) च्या माध्यमातून करण्यात येणार असून यात Wadhwani Operating Foundation (WOF), California, USA (Non-Profit Organisation) ही Knowledge Partner असणार आहे.

केंद्र शासनाच्या निदेशानुसार सदर योजनेच्या राज्यातील प्रभावी अंमलबजावणीच्या सनियंत्रणासाठी राज्य स्तरावर सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली Joint Working Group (JWG) गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयामार्फत सन २०१७-१८ ते २०२१-२२ या ०५ वर्षाच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री युवा योजनेच्या राज्यातील प्रभावी अंमलबजावणीच्या सनियंत्रणासाठी राज्य स्तरावर अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्या अध्यक्षतेखाली खालील सदस्यांचा Joint Working Group (JWG) या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग | - | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | - | सदस्य |
| ३. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | - | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | - | सदस्य |
| ५. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कामगार), उद्योग, उर्जा व कामगार विभाग | - | सदस्य |
| ६. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (नोडल व्यवस्थापक) | - | सदस्य |
| ७. | उच्च शिक्षण संस्थांचे ०५ नामनिर्देशित प्रतिनिधी (दोन वर्षाच्या आवर्तनाने) | - | सचिव |
| ८. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शाळा व उद्योजकता विकास केंद्र यांचे प्रत्येकी ०२ प्रतिनिधी (दोन वर्षाच्या आवर्तनाने) | - | सचिव |
| ९. | प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक ई-हब, पश्चिम विभाग, अहमदाबाद | - | सदस्य सचिव |

उच्च शिक्षण संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शाळा तसेच उद्योजकता विकास केंद्र यांच्या प्रतिनिधींना Joint Working Group चे सदस्य म्हणून नियुक्त करण्याचे अधिकार अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग तथा अध्यक्ष, Joint Working Group यांना राहतील.

२. उक्त समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहील.

योजनेच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे, राज्यातील उद्योजकता प्रशिक्षण/विकासाशी संबंधित योजनांचे समन्वये व Convergence करणे, योजनेची व्याप्ती वाढविण्यासंदर्भात कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करण्याबाबत शिफारस करणे, सदर योजनेंतर्गत प्रशिक्षण देण्यात येणाऱ्या उद्योजकता विषयक अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा सुचविणे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०४१९१५५९३५२३०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Wasudev Gawande

Digitally signed by Gajanan Wasudev Gawande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development And Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=598b4111a7392ee0c9038cf4c426c1f9ef65d75e9ac67ec77c38a9c5895cc932, serialNumber=92cce2bddffe9d1b98d5b31109f5f81e224273580cfca2f478d921078212cf69, cn=Gajanan Wasudev Gawande
Date: 2018.04.19 16:01:43 +05'30'

**( गजानन वा. गावंडे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. सर्व संबंधित मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व संबंधित मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य

७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, दुसरा मजला, शिवाजी स्टेडियम, विस्तार इमारत, शहीद भगत सिंह मार्ग, नवी दिल्ली-११०००१.
९. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
१२. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. National Entrepreneurship Resource and Co-ordination Hub (National E-Hub), NIESBUD, A-23, Sector-62, NOIDA, U.P.
१४. Entrepreneurship Resource and Coordination Hubs, Regional E-Hub, Western Region, Ahmedabad.
१५. निवड नस्ती. (अभियान-१).